■ POSTEL REGD NO. AKOLA DN./285/2022-2024

साप्ताहिक

स्थापना : जुन २००८

# पिंगलाक्षी एक्सप्रेस



मुख्य संपादक : गजानन बानोरे 9420100590, 9075407343 R.N.I. No. MAHMAR/2008/24720

● रिसोड जि.वाशीम ● वर्ष १७ ● अंक २३ ● मंगळवार, दि. २२ ते २९ ऑक्टोंबर २०२४ ● पृष्ठे ४ ● किंमत १ रू



# काय म्हणता? वाचनातून रोजगार मिळवता येतो?

सध्या मोबाइल आणि इंटरनेटच्या जगामध्ये वाचनालये आणि वाचन संस्कृती लोप पावत आहे. मिलेनिअल आणि जेन-झी (जेनेशन-झेड) पिढी वाचन संस्कृती पासून दूर गेली आहे. पुस्तक हाताळणे म्हणजेच पुस्तक हातात घेऊन वाचणे, नवीन पुस्तकांचा सुगंध घेणे, इत्यादी गोष्टी नवीन युगामध्ये कमी झालेल्या आढळतात. या दोन पिढ्या वाचत नाहीत, असे नाही. परंतु आता वाचनाच्या संज्ञा बदलत चालल्या आहेत. ही पिढी वाचन करण्यासाठी, मोबाईलेचा मोठ्या प्रमाणावर वापर करते. मोबाईल आणि इंटरनेट क्रांतीने वाचनाचे प्रकार देखील बदललेले आहेत. आज बरेच वाचक ई-बुक्सच्या माध्यमातून आपला वाचनाचा छंद जोपासतात. तसेच आपल्यापैकी बरीच मंडळी पुस्तके, कादंबऱ्या, गोष्टी, इत्यादी ऑडिओ बुक्सच्या माध्यमातून मोबाइलवर ऐकतात (वाचतात). ऑडिओबुक्स हा प्रकार एका विशिष्ट सामाजिक घटकामध्ये अत्यंत लोकप्रिय देखील आहे. इतर पुस्तकांप्रमाणे ही पुस्तके देखील विकत घ्यावी लागतात.

परंतु हे वाचन खूप एकांगी आणि व्यक्तिकेंद्रित किंवा व्यक्तिवादी स्वरूपाचे असते. पुस्तक वाचून त्यावर होणाऱ्या चर्चेतून सामाजिक जडणघडणीला हातभार लागतो, ती संपूर्ण प्रक्रिया अशा स्वरूपाच्या व्यक्ति केंद्रित वाचनातून होतांना दिसत नाहिये. प्रत्येक शहरांमध्ये 'सार्वजनिक वाचनालये' असतात. मुंबईमध्ये कित्येक लोकांना नेहरू सेंटर, वरळी येथील असेच एक वाचनालय माहीतही नसेल. टाऊन हॉल किंवा एशियाटिक सोसायटी ऑफ इंडिया हे आता दुर्दैवाने फोटो काढण्याचे ठिकाण झाले आहेत. मुंबई शहर सांस्कृतिक चळवळीचे केंद्रबिंदू राहिले आहे आणि त्यामध्ये साहित्याचा खूप मोठा वाटा आहे.

## रिसोड तहसील कार्यालयात राजकीय पदाधिकाऱ्याची बैठक संपन्न



वाशिम : रिसोड विधानसभा मतदारसंघातील सर्व राजकीय पक्षाची निवडणुकी संदर्भात माहिती देण्यासाठी रिसोड विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी वैशाली देवकर यांच्या अध्यक्षतेखाली व सहकारी प्रतीक्षा तेजनकर तहसीलदार पुंड यांच्या उपस्थितीत तहसील कार्यालयातील सभागृहात आज दिनांक २० ऑक्टोबर रोजी दुपारी बारा वाजता ही बैठक आयोजित करण्यात आली होती त्यामध्ये नामनिर्देशन पत्र दाखल करण्यासाठी संपूर्ण माहिती देण्यात आली त्यामध्ये नामनिर्देशन पत्र दिनांक २२ ऑक्टोबर ते २९ ऑक्टोबर या कालावधीत सकाळी १ ते ३ वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय रिसोड तहसीलदार यांचे दालनात स्वीकारण्यात येतील सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी कोणतेही नामनिर्देशन पत्र स्वीकारले जाणार नाही यामध्ये शपथपत्राचा नमुना दिनांक २२ ऑक्टोबर २९ ऑक्टोबर या कालावधीत सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत मिळेल उमेदवारास कमीत कमी एका प्रस्तावाने किंवा सूचकांनी स्वत: उपस्थित राहून नामनिर्देशन पत्र दाखल करणे आवश्यक आहे एका विधानसभा क्षेत्रात दोन अर्ज पेक्षा जास्त अर्ज घेता येणार नाही एका विधानसभा मतदारसंघात चार पेक्षा जास्त अर्ज स्वीकारता येणार नाहीत. शपथपत्राशिवाय कोणताही अर्ज पूर्ण होणार नाही याबाबतची प्रत्येक उमेदवाराने दखल घेणे आवश्यक आहे. नामनिर्देशन दाखल करतेवेळी उमेदवारांनी निवडणूक निर्णय अधिकारी किंवा सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे समक्ष शपथ घेणे आवश्यक आहे किंवा क्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. कोणत्याही उमेदवारावर ज्या केसेस आहेत किंवा आरोप झालेत इत्यादी पेपर मध्ये त्या उमेदवारास तीन वेळा याबाबतची जाहिरात देऊन खुलासा करणे आवश्यक आहे इत्यादी माहिती आज राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना ३३-रिसोड विधानसभा निवडणूक निर्णय अधिकारी वैशाली देवकर यांनी दिली आहे.

## संत तुकाराम महाराज विद्यालयात शिक्षक पालक सभेचे आयोजन



रिसोड तालुक्यातील कंकरवाडी येथील संत तुकाराम महाराज विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालयात दिनांक १९ सप्टेंबरला वार शनिवारला शिक्षक पालक सभेचे आयोजन करण्यात आले.याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक साहेबराव जाधव यांचे अध्यक्षतेखाली शिक्षक पालक सभेला सुरुवात करण्यात आली.या सभेमध्ये शाळेतील विविध विदयार्थी व शिक्षकांच्या समस्यावर तसेच प्रश्नावर चर्चा करण्यात आली. सभेमध्ये विविध विषय मांडण्यात आले. त्यावर सविस्तर चर्चा होऊन सभेमध्ये ठराव मंजूर करण्यात आले. या सभेसाठी शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष शिवाजी मोहरे तसेच सदस्य उद्धव बोंडे, भगवान फुपाटे , पिराजी घनघाव , शेख चांद, समाधान , दशरथ बोडखे घोडके, समाधान क-हाळे, सिद्धार्थ कांबळे, प्रदीप शेजुळ ,आश्रुबा खिल्लारे , रंगनाथ जाधव, सखारामजी कोल्हे, यादव माघाडे व सर्व शाळेतील शिक्षक शिक्षिका शिक्षक पालक संघाचे सचिव विठ्ठल वाघ हे सर्वजण उपस्थित होते. मुलांच्या प्रगतीचा यावेळी आढावा घेण्यात आला.तसेच दहावी बारावीच्या परीक्षेच्या संदर्भात आवेदनपत्रे भरण्याबाबत तसेच विविध परीक्षेच्या बाबत चर्चा करण्यात आली. तसेच शिष्यवृत्ती बाबतही चर्चा करण्यात आली. अशा रीतीने विद्यालयात शिक्षक पालक संघ सभा संपन्न झाली.

पिंगलाक्षी एक्सप्रेस
नियमित वाचा

# रिसोड येथे 'डीएपी' मिळेना; खतासाठी शेतकऱ्यांची धावपळ

## रब्बीची पेरणी खोळंबली : कृषी विभागाने लक्ष देण्याची मागणी

रिसोड : येथील बाजारपेठेत डीएपी खतांचा तुटवडा जाणवत आहे. शहरातील दोन दुकानांमध्ये डीएपी खत उपलब्ध असल्याची चर्चा शेतकऱ्यांमध्ये सोमवारी दिवसभर होती; परंतु संबंधित दुकानदारांकडून शेतकऱ्यांना डीएपी उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. डीएपी खतांचा तुटवडा निर्माण झाल्याने शेतकऱ्यांना रब्बीच्या पेरणीत अडचणी येत आहेत.

शेतकरी रब्बी हंगामाच्या तयारीला लागला आहे. यंदा मुबलक पाऊस पडल्याने शेतकरी रब्बी पेरणीची घाई करू लागले आहेत. सोयाबीनच्या काढणीनंतर हरभरा पेरणीसाठी जमिनीच्या मशागतीही शेतकरी करत असून, आता डीएपी खतांची मागणी त्यांच्याकडून करण्यात येत आहे. तथापि, रिसोड शहरातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांकडे डीएपी उपलब्ध नसल्याचे सांगितले जात असल्याने शेतकऱ्यांसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे काही शेतकरी डीएपी खताच्या खरेदीसाठी मालेगाव येथे जात आहेत. त्यामुळे कृषी विभागाने डीएपीच्या उपलब्धतेची चौकशी करावी आणि शेतकऱ्यांना या खताचा पुरवठा करावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.



### आजपासून मिळणार शेतकऱ्यांना डीएपी

रिसोड शहरात अचानक डीएपी खताचा तुटवडा निर्माण झाला आहे. त्यामुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत. या संदर्भात कृषी विभागाशी संपर्क साधून माहिती घेतली. त्यावेळी शेतकऱ्यांना २२ ऑक्टोबरपासून खत उपलब्ध करून देता येईल, अशी माहिती संबंधित अधिकाऱ्यांनी दिली.

> सद्यस्थितीत शेतकरी रब्बीच्या पेरणीची तयारी करीत आहेत. यासाठी आवश्यक डीएपी खताची मागणी त्यांच्याकडून होत आहे. तथापि, शहरात हे खत उपलब्ध नसल्याचे खतविक्रेत्यांकडून सांगितले जात असून, चौकशी करणाऱ्या शेतकऱ्यांशी विक्रेते सरळ भाषेत संवादही साधत नाहित.
> - रुपेश ठाकूर, शेतकरी, रिसोड

# शिवाजी विद्यालयाने पटकाविला तिसरा क्रमांक

## 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा' स्पर्धेचा निकाल जाहीर

**रिसोड, ता. २१ :** मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानांतर्गत भर जहागीर केंद्र स्तर श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय भर जहागीर प्रथम क्रमांक रिसोड तालुक्यातून श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय भर जहागीर प्रथम क्रमांक आणि विशेष आनंदाची बाब म्हणजे राज्यभरातून सहभागी झालेल्या शाळांचे मूल्यमापन केले असता श्री शिवाजी शिक्षण संस्था वाशिम अंतर्गत श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय भर जहागीर विद्यालयाने वाशिम जिल्ह्यातून सदर अभियानांतर्गत तृतीय क्रमांक मिळविला आहे.

या कामी विद्यालया प्राचार्य बी.जी काळे सर यांचे मार्गदर्शन मिळाले. विद्यालयातील सर्व शिक्षक,प्राध्यापक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी बंधू भगिनी यांच्या नियोजनबद्ध मेहनतीतून श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाने हे यश संपादन केले. विद्यालयाच्या या यशाचे संस्थेचे अध्यक्ष तथा विद्यमान शिक्षक आमदार ॲड. किरणराव सरनाईक, उपाध्यक्ष दादासाहेब लाहोरे, उपाध्यक्ष अरुणराव सरनाईक, संस्थेचे सचिव भिकाजीराव नागरे, श्री शिवाजी शिक्षण संस्था वाशिमचे नवनिर्वाचित संचालक स्नेहदीप सरनाईक यांनी तसेच स्थानीय शाळा समितीचे अध्यक्ष महंतरमेश गिरी महाराज, संचालक डॉ. श्रीराम गरकळ, संचालीका गंगासागरताई चोपडे व संचालक अशोक आप्पाजी काष्टे यांनी शिवाजी विद्यालय भर जहागीरच्या चमूचे अभिनंदन केले आहे. हे यश संपादन केल्यामुळे शिवाजी विद्यालयाच्या शिरपेच्यात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. परिसरातील पालकांनी, गावकऱ्यांनी व शुभचिंतकांनी विद्यालयाच्या या यशाबद्दल मनस्वी आनंद व समाधान व्यक्त केले आहे.


भर जहागीर येथील शिवाजी विद्यालय.

# कर्मचाऱ्यांचा पैसे घेतानाचा व्हिडिओ व्हायरल

## पिकविमा नुकसानीचा सर्व्हे करणाऱ्यासाठी पैशांची मागणी

**रिसोड, ता. २१ :** पिकविमा कंपनी नुकसानीचे सर्व्हे करणारे कर्मचारी शेतकऱ्यांची नुकसान भरपाई एकाच ठिकाणावर बसून करून घेत आहेत व शेतकऱ्यांना पैशांची मागणी करत आहे. याची चित्रफित समाज माध्यमावर प्रसारित झाली. या कर्मचाऱ्यांवर रिसोड तहसीलदारांनी कारवाई केल्याची माहिती असून या कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी होत आहे.

वाशीम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यांमध्ये घोटा, चिखली, हराळ, या गावांमध्ये पिकविमा कंपनीचे सर्व्हे करणारी टीम एकाच ठिकाणावर बसून शेतकऱ्यांचे नुकसानीचे फॉर्म भरून घेत आहे शेतकऱ्यांना पैशाची मागणी करत आहेत. आम्ही तुमचे नुकसान शंभर टक्के टाकतो आम्हाला पैसे द्या अशी पिकविमा कंपनीचे सर्व्हे करणाऱ्या टीमची पैशांची मागणी करत आहे आधीच शेतकरी संकटात सापडला त्यावर पिकविमा कंपनी शेतकऱ्यांना लुटत आहे. शेतकऱ्यांना कंपनी सांगते नुकसान झाली तर ७२ तासाच्या तासाच्या आत नुकसानीचे तक्रार द्यायला सांगते. तसे नुकसानीचे पंचनामे करायला दोन महिन्याने का येते शेतकऱ्यांच्या बांधावर हा ही आता प्रश्न शेतकऱ्यांच्या मनामध्ये पडला आहे. जसे कंपनी शेतकऱ्यांना नियम लावते नुकसानीचा ७२ तासांच्या आत क्लेम करा तसे पंचनामे करायला तातडीने कंपनी का येत नाही. शेतकऱ्यांना लुटणाऱ्या पिकविमा कंपनीच्या प्रतिनिधीवर रिसोड तहसीलदारांनी कारवाई केली असल्याची माहिती आहे.

> एआयसी पिकविमा कंपनी वाशीम जिल्ह्यातील शेतकऱ्यांना लुटणाऱ्या कंपनीवर प्रशासनानेच कडक कारवाई करावी अन्यथा शेतकऱ्यांच्या रोषाला सामोरे जावे लागेल.
> **- बालाजी मोरे,** शेतकरी

पिंगलाक्षी एक्सप्रेस (मराठी साप्ताहिक ) । R.N.I. No. MAHMAR/2008/24720
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक गजानन श्रीराम बानोरे यांनी दिप प्रिंटर्स (मुद्रक - राम उत्तमराव सालवणकर) वारा जहां. ता.जि.वाशीम येथे छापून कार्यालय, साप्ता. पिंगलाक्षी एक्सप्रेस, सिध्दी विनायक शिक्षक कॉलनी, मु.पो. ता. रिसोड जि. वाशीम (महा.) येथून प्रकाशित केले. (सर्व वाद रिसोड न्यायालया अंतर्गत) प्रकाशित असलेल्या सर्व लेख व वृत्ताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (पी.आर.बी. ॲक्ट नुसार संपादक जबाबदार)

# स्व. रामभाऊ टेमधरे व्याख्यानमालेचे सदोतीसवे वर्षे म्हणजे सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव - डॉ. किशोर नागूलकर

रिसोड/प्रतिनिधी :- स्थानिक स्वामी विवेकानंद सार्वजनिक वाचनालय व क.रा फाउंडेशन रिसोडच्या वतीने आयोजित तीन दिवसीय स्व. रामभाऊ टेमधरे स्मृती व्याख्यानमालेचे उदघाटन १८ ऑक्टोबर च्या सायंकाळी ६ वाजता करण्यात आले.पहिल्या दिवशी सुप्रसिद्ध आयुर्वेद विशारद डॉ. किशोर नागुलकर यांनी आयुर्वेदिक पंचकर्म म्हणजे आनंदातून आजाराची निवृत्ती या विषयावर पहिले पुष्प गुंफले.

व्याख्यानमालेच्या उदघाटन प्रसंगी अध्यक्षस्थानी डॉ. नंदकिशोर रंजवे तर व्याख्याते डॉ. किशोर नागुलकर उपस्थित होते. व्याख्यानमालीचे हे ३७ वर्ष असून यापूर्वी साहित्य, क्रीडा, आध्यत्मिक, राजकीय, सामाजिक क्षेत्रात नामवंतानी व्याख्यानमालेला भेट दिली. यु म पठाण, डॉ राम शेवाळकर, मुजफ्फार हुसेन, प्रतिभा इंगोले, श्रीकांत देशमुख इत्यादिनी व्याख्याते म्हणून हजेरी लावून व्याख्यानमालेचा दर्जा उंचावला आहे. १८,१९ आणि २० ऑक्टोबर या तीन दिवशीय व्याख्यानमालेच्या पहिल्या दिवशी रिसोड शहरातील सुप्रसिद्ध आयुर्वेद चिकित्सक डॉ.किशोर नागूलकर यांनी पहिले पुष्प गुंफले स्व. रामभाऊ टेमधरे स्मुर्ती व्याख्यानमाला ही सामाजिक उत्तरादायित्वाची जाणीव करुन देणारे व्यासपीठ असून येथे व्यक्त होण्यासाठी मिळणे ही स्वतःची पात्रता सिद्ध करण्याची संधी असल्याचे डॉ.नागूलकर यांनी मनोगत व्यक्त केले.

आयुर्वेदिक चिकित्सा हजारो वर्षांपासून विश्वासनीय चिकित्सा आहे. थोर ऋषीं मुनींनी आयुर्वेदात विविध प्रयोग करुन सर्व प्रकारच्या आजारावर हमखास उपचार शोधून मानवी जीवन सुखी केले आहे.

आजही सर्व प्रकारचे उपचार करुन थकल्यावर माणूस आपसुकच आयुर्वेदाकडे वळतो. कर्करोगा सारख्या रोगावरही आयुर्वेदात




खात्रीशीर उपचार झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. आयुर्वेद बिमार झाल्यावरच उपचार करावा यासाठी नव्हे तर बिमार होणारच नाही यासाठी ही मार्गदर्शन करणारी सर्वोत्तम शाखा आहे. पंचकर्म केल्याने आनंदाने जीवन व्यतीत करुन आजारांची निवृत्ती करने सहज शक्य असल्याचे डॉ. किशोर नागूलकर यांनी आपल्या व्याख्यानात सांगितले. अतिशय सोप्या भाषेत व प्रचंड अभ्यासयुक्त व्याख्यान यामुळे सर्व श्रोते आनंदित झाले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना डॉ. नंदकिशोर रंजवे यांनी वाचनालयाच्या माध्यमातून वाचन संस्कृती टिकवून ठेवण्याचे महान कार्य होत असताना व्याख्यानमालेच्या ३७ व्या वर्षात सामाजिक आशयाचे विषय घेऊन सामाजिक प्रबोधन आणि उदबोधन करण्याची परंपरा सुसंस्कृत समाजाचा आरसा असल्याबद्दल डॉ रंजवे यांनी वाचनालयांचे संस्थापक प्रा. कमलाकर टेमधरे यांना विशेष धन्यवाद दिले.

व्याख्यानमालेच्या पहिल्या दिवसाचे प्रास्ताविक प्रा. कमलाकर टेमधरे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. डॉ. प्रवीण हाडे यांनी करुन दिला. सूत्रसंचालन रवि अंभोरे यांनी तर आभारप्रदर्शन विश्वभर डाखोरे यांनी केले. श्रोत्यांनी व्याख्यानाचा आनंद घेत डॉ. साहेबांनी सुचविलेल्या सूचनावर अमल करण्याचा विश्वास सुद्धा व्यक्त केला.

# देशाची शान स्त्रीचा सन्मान - डॉ. माया गायकवाड

रिसोड - स्थानिक उत्तमचंद बगडिया कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयामध्ये लैंगिक शोषण व रॅगिंग विरोधी समिती आणि एन एस एस यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. संजय टिकार होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून अँड. नूतनताई भराड, स्त्रीरोग तज्ञ माया गायकवाड या होत्या. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य विनोद कुलकर्णी यांची विशेष उपस्थिती होती.

कार्यक्रमाची प्रास्ताविक प्रा.डॉ. कोमल काळे मॅडम यांनी केले .त्यांनी आपल्या प्रास्ताविकातून स्त्रियांची वेगवेगळी रुपे सांगितली .त्याचप्रमाणे स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी असे मत मांडले. अँड. नूतनताई भराड यांनी महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रियांना स्वतःचे निर्णय घेण्यास सक्षम बनवणे असे म्हटले .पंडित जवाहरलाल नेहरू यांनी म्हटले आहे की लोकांना जागृत करण्यासाठी महिलांना जागृत असणे आवश्यक आहे .तेव्हा तिचे कुटुंब ही प्रगती करते. स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. माया गायकवाड यांनी आपल्या मनोगतातून देशातील प्रगतीवान महिलांची अनेक उदाहरणे दिली उदा,मासाहेब जिजाऊ,सावित्रीबाई फुले,झाशीची राणी,इंदिरा गांधी,कल्पना चावला,पी टी उषायांनी देशाला शौर्य अभिमान दिला स्त्री ही घराचा कणा आहे तो जेवढा सशक्त तेवढाच देश बलवान होईल असे म्हटले तर प्रा. संजय टिकार यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून प्रदीर्घ संघर्ष नंतर स्त्रियांना मालमत्तेचा हक्क,मतदानाचा हक्क,नागरी हक्क,विवाह आणि नोकरीच्या बाबतीत कायदेशीर संरक्षण मिळाले आहे सक्षमीकरण घडून आणण्यास महिलांना स्वतःच्या



हक्काबद्दल जागृत करणे आवश्यक आहे असे मत मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उर्मिला गिरी यांनी केले तर आभार प्रा. संजना वनारे यांनी केले . कार्यक्रमाला प्रा डॉ. वानखडे, प्रा. डॉ. बुधवंत, प्रा.डॉ. नंदेश्वर, प्रा. डॉ. मेश्राम, प्रा. डॉ . खेडेकर मॅडम, प्रा. डॉ. नरवाडे, प्रा. प्रजापती, प्रा संदीप जुनघरे, प्रा राम जुनघरे, प्रा. पाठक, प्रा. शुंभागी मानमोठे, प्रा. बाजड, हिंगमिरे मॅडम, प्रा. राऊत उपस्थित होते . कार्यक्रमाला विद्यार्थी हजर होते.

## कृषी कन्यांनी दिली बॅंकेला भेट

रिसोड : डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला सलग्नित कृषी महाविद्यालय, रिसोड येथील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी ग्रामीण कृषी जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम व कृषी औद्योगिक जोड २०२४-२५ या अंतर्गत कृषीकन्या निकिता शेंदूरकर, साक्षी बुरडे, माया



भुसारी, प्रांजली खिराडे, श्वेता जाधव, सलोनी फरतोडे आणि धनश्री नरवाडे यांनी कृषी कर्जाबद्दल माहिती घेण्यासाठी बॅंकेला भेट दिली.

यावेळी बॅंकेतील कर्मचाऱ्यांनी बॅंकेविषयी व पीक कर्ज विषयी महत्त्वाची माहिती दिली व त्यासाठी लागणारे कागदपत्र नियम व अटी विषयी संपूर्ण माहिती त्यांनी दिली. यासाठी कृषी महाविद्यालय रिसोड चे प्राचार्य डॉ. आशिष अप्तुरकर, तांत्रिक समन्वयक आर.एस. डवरे, कार्यक्रम समन्वयक डी. डी. मसुरकर, कार्यक्रम अधिकारी जी. बी. बाजड व तसेच विषय विशेषतज्ञ के. एम. वानखडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.(श.प्र.)

## कालबाह्य वाहनांवर कारवाईचा मुहूर्त कधी निघणार

रिसोड : शहरातील रस्त्यावर भंगार वाहने धावत असल्याने या वाहनातून निघणाऱ्या घातक धुरामुळे वायू प्रदूषणात वाढ झाल्याचे चित्र दिसून येत आहे.तसेच यामुळे नागरिकांचे नाकावर हात झालेआहे.एकूणच अश्या प्रकारच्या वाहनांवर कारवाईचा म्हुर्त कधी निघणार असा प्रश्न निर्माण झाला आहे.

अलीकडच्या दिवसांमध्ये शहरातील वायू प्रदूषणात वाढ होतअसल्याचे चित्र दिसून येत आहे आता वाहनाची संख्या वाढत आहे तर शहरातील काही थेट वाहन घातक धूर निघत असल्याचे दिसून येत आहे.आता वाहनाचे प्रमाण वाढले आहे गाडीतून निघणारा हानिकारक धूर निघत असल्याने वायुप्रदूषणत वाढ होत आहे तसेच शहरातील काही वाहनांमधून धूर निघत असल्याचे दिसून येत आहे लोकडाऊनच्या काळामध्ये वायुप्रदूषणत लक्षणीय घट झाल्याचे पुढे आले असतांना आता वाहनाची संख्या वाढत आहे तर शहरातील काही वाहन मधून घातक धूर निघत असल्याचे दिसून येत आहे याकडे लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे याकडे आता संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत आहे.गेल्या दोन महिन्यांचा सर्वे केला असता शहरात मुख्य मार्गावर विविध प्रकारची भंगार वाहने धावत आहे. या वाहनांमधून घातक धूर निघत असल्याचे दिसून येत आहे.अश्या प्रकारच्या वाहनांवर कारवाईचा म्हुर्त कधी निघणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. (श.प्र.)

## महर्षि वाल्मिकी यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

वाशिम,दि.१७ ऑक्टोबर (जिमाका): 'रामायण' महाकाव्याचे रचनाकार महाकवी महर्षि वाल्मिकी यांची जयंती आज जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयातील राजे वाकाटक सभागृहात आयोजित कार्यक्रमात सहाय्यक अधीक्षक सुनील घोडे यांनी महर्षि वाल्मिकी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित अधिकारी -कर्मचाऱ्यांनी प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

# रिठदच्या तलाठी कायम अनुपस्थित : शेतकऱ्याची कामे खोळंबली

रिठद - गाव तालुक्यात सर्वात मोठे असून येथे महसूली क्षेत्र सुद्धा जास्त असून शेतकऱ्यांची संख्या सुद्धा जास्त असल्याने अर्थातच खातेदार जास्त आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची कोणती ना कोणती कामे तलाठ्याकडे पडतच असतात. दरम्यान रिठद गावातील शेतकरी सुभाष प्रल्हाद बोरकर सुशिक्षित बेरोजगारांने शेतीच्या भरोशावर शेतकऱ्याने आर्थिक विकास महामंडळाकडून म्हसी घेऊन या दुधाच्या व्यवसायासाठी कर्ज घेतले होते त्या कर्जाचा बोजा सातबारावर चढवल्या गेला होता.

तो उतरवण्यासाठी सतत तहसील मध्ये एक महिना लोटला व त्यानंतर आज दहा ते बारा दिवस झाले तलाठी कार्यालयाकडे चकरा मारत आहेत. आज दिनांक २१ आक्टो. रोजी सकाळी १०,११,१२, वा. शेतकऱ्याने तलाठी कार्यालय भोवताल चक्रा मारल्या. परंतु तलाठी कार्यालय बंदच होते.१२.४२ मी. तलाठी कार्यालय स्थानिक माणसाच्या हाताने उघडले. सुशिक्षित बेरोजगारांने बोजा कमी करण्यासंदर्भात तलाठी संत्रे यांच्या व्हाट्सअप वर या बाबीची कल्पना दिली परंतु त्यांना निवडणुकीच्या कारणास्तव कोणताही वेळ नसल्याचे त्या सांगतात.

ही कामे होण्यासाठी शिवसेनेचे तालुकाप्रमुख नारायणराव यांनी तलाठी संत्रे यांना फोन केला असता आपण फोन करणारे कोण ? आपलं काही काम नाही ! ज्यांचं काम आहे त्यांनी फोन करावा. असे उद्धटपणे बोलणार्या तलाठी संत्रे यांच्यावर कार्यवाही करावी. याबाबत लेखी तक्रार करणार उद्या असल्याचे नारायण आरू यांनी सांगितले. इलेक्शनच्या नावावर कायम दांड्या मारणे हाच धंदा तलाठी संत्रे यांनी धरला असून या अगोदरही जेव्हापासून रिठद मंडळात रुजू झाल्या तेव्हापासून कधी येणे, कधीही जाणे.असे चालू राहिले तर शेतकऱ्यांच्या हिताची कामे कशी होणार ? ही गंभीर बाब लक्षात घेता तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर यांनी संबंधितांना कारणे नोटीस देऊन कार्यवाही करावी. व मंडळ अधिकारी पटवे यांना उद्धटपणे बोलण्याबाबत कल्पना सुद्धा दिली व अशा उद्धट तलाठ्याची रिठद येथे शेतकऱ्यांना कोणतेच गरज नाही त्यामुळे यांचे तात्काळ बदली करण्यात यावी. किंवा कायम अशा तलाठ्याची ड्युटी लावावी. त्यामुळे इलेक्शन दरम्यान कोणतेच काम करायचे नाही असे कदाचित तलाठी संत्रे यांनी ठरवले असावे अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.